महाराष्ट्र शासन
कर्मवीर मा.सां.कन्नमवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर
Karmaveer M.S.Kannamwar Government Medical College, Chandrapur - 442401,
Maharashtra, INDIA
Telephone No. 07172- 277104
Website : www. gmcchandrapur.org
Fax No. 07172- 277103
Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमवरुचं/आस्था-१,२/रिक्त सहाय्यकप्राध्यापक/३६४ दिवसाकरिता/ 8964-70 /२५ दि. 21 /११/२०२५

## -: जाहिरातीची सुचना :-

**विषय :- स्थानीक निवड समितीमार्फत (डि.एस.बी.) तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरिता सहाय्यक प्राध्यापक गट-ब ची पदे भरण्याबाबत.**

**संदर्भ :- शासन निर्णय क्र. एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दिनांक १८/७/२०२४**

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर या आस्थापनेवरील **सहाय्यक प्राध्यापक ( एपीडोमोलॉजीस्ट-नि-सहाय्यक प्राध्यापक सह )** यांचे रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसासाठी उमेदवारांकडून भरण्यास पृथक अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचे कोरे नमुने जाहीरातीच्या दिनांकापासुन विहित कालावधीत अर्जाचे शुल्क रु.२००/-( अक्षरी रुपये दोनशे फक्त) **दिनांक २४/११/२०२५ ते दिनांक ०५/१२/२०२५ पर्यंत वेळ १०:३० ते ५:०० पर्यंत अधिष्ठाता कार्यालय, आस्थापना विभाग वर्ग १ व २ येथे उपलब्ध आहे. ऑफलाईन अर्ज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी ६:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील, तसेच सदर पदांकरिता मुलाखती दि.१५/१२/२०२५ रोजी ठिक ११: ३० वाजता मा. अधिष्ठाता यांचे दालनात ठेवण्यात आली आहे.** यासंबंधीच्या अधिक माहितीकरीता सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या www.gmcchandrapur.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### सहाय्यक प्राध्यापक रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | विषयवार | एकूण रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | १ | राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या (N.M.C.) अधिसुचना दिनांक ३० जून २०२५ च्या मानकानूसार | शासन निर्णयानूसार आरक्षण लागू राहील. |
| २ | औषधशास्त्र | २ | | |
| ५ | न्यायवैद्यकशास्त्र | २ | | |
| ६ | जनऔषधवैद्यकशास्त्र **(Eped. Cum –Assistant Professor )** | १ | | |
| ७ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | | |
| एकूण पदे | | ०७ | | |

( कृ.मा.प.)

Scanned with OKEN Scanner

रिक्त जागांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील तसेच या जाहिरातीमधील कोणताही मजकूर उदा. अटी,शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादीमध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी स्वता:कडे राखून ठेवला आहे.

सर्व जाहिरातीतील सर्व रिक्त पदांसाठी मुलाखती घेण्यात येत असून, रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश ३६४ दिवसांकरिता देण्यात येतील व तदनंतर रिक्त पदे उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल. उमदेवारांची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. जर उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज सादर करावयाचा असेल तर प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज सादर करावा लागेल.

**नियम व अटी :-**

१. वेतनश्रेणी :- सहाय्यक प्राध्यापक यांना दिनांक ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार रु.१,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष दहा हजार फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उदिष्टांमधून भागविण्यात येईल.

२.वयोमर्यादा :- सेवाप्रवेश नियमानूसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरिता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहील. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३. गुणवत्ता :- राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकाची पुर्तता करण्याकरिता वरील पदाकरिता वरिष्ठ निवासी पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव असने आवश्यक राहील.

४. एम.डी./एम.एस. किंवा एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम याच संस्थेतून पास केलेल्या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल. उमेदवार जर याच संस्थेतून पास झाला नसल्यास महराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून व इतर राज्यातून आलेल्या उमेदवाराना विभागाची निकड लक्षात घेता प्राधान्य देण्यात येईल.

५. सहाय्यक प्राध्यापक पदाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

६. मिरीट गुण पी.जी. आणि यु.जी. नूसार प्राधान्य देण्यात येईल. तसेच शोध निबंध, राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

७. सदर तात्पुरती नियुक्ती ही महराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा इतर संस्थेतून बदलीने उमेदवार रुजू होईपर्यंत किंवा संचालनालया मार्फत बंधपत्रीत उमेदवार म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीने रुजू होईपर्यत किंवा शासन स्तरावरील निवडमंडळामार्फत नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा विभागातील पदे कमी झाल्यास जे आधि घडेल तोपर्यत राहील.

८. निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असतांना सतत जास्त कालावधीत गैरहजर असल्यास किंवा काम समाधान कारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

(कृ.मा.प.)

Mahabharti.in
Scanned with OKEN Scanner

९. मुलाखतीस उपस्थीत राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनंदीन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही तसेच मुलाखतीस उपस्थीत राहण्याकरिता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१०. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितिवर प्रतक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

११. सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१२. संस्थेत तात्पुरत्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज विभाग प्रमुखामार्फत सादर करण्यात यावे.

१३. उमेदवार या महाविद्यालया व्यतरीक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्था प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला असल्यास तसे अर्जात नमुद करण्यात यावे.

१४. सदर पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसासाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर राहिल. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देवून पुन्हा ३६४ दिवसासाठी पुनर्नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना सादर करण्यात येईल.

१५. अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तदनंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे** - **(अ)** प्रथम, व्दितीय तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी/एमएस किंवा समतुल्य् या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे **(ब)** सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्त्र पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षांची गुणपत्रिका **(क)** एन.एम.सी.तसेच एम.सी.आय. नुतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र **(ड)** जातीचे प्रमाणपत्र व जात जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) **(इ)** जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला **(फ)** एक वर्ष वरीष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र **(ग)** पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत, **(घ)** MS-CIT संगणक परिक्षा उत्तिर्ण प्रमाणपत्र इ. कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

- **सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या <u>www.gmcchandrapur.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध् आहे.**

(डॉ.एम.बी कांबळे)
अधिष्ठाता
कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यलय
चंद्रपूर

**प्रति,**

१) संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, कर्मवीर मा. सां.कन्नमवार शा.वै.म. चंद्रपूर.

२) सर्व सुचना फलकांकरीता, कर्मवीर मा. सां. कन्नमवार शा.वै.म. चंद्रपूर.

३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

**(कृ.मा.प.)**

Scanned with OKEN Scanner

४) रोखपाल, रोखपाल शाखा, कर्मवीर मा. सां.कन्नमवार शा.वै.म. चंद्रपूर यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी इच्छुक असलेलया सहाय्यक प्राध्यापक उमेदवारांकडून (शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनांकापासुन विहित कालावधीत अर्जाचे शुल्क रु.२००/-(अक्षरी रुपये दोनशे फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

**प्रत -**

१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner